# अमेरिका-ब्रिटनच्या युद्धखोरीचे सत्यदर्शन

**चन्द्रशेखर पुरन्दरे**

२००३ ला खोटी कारणे पुढे करून अमेरिका व ब्रिटन यांनी संयुक्तपणे इराकवर युद्ध लादले. हे युद्ध सहा वर्षे चालले. त्यात किमान दोनशे ब्रिटीश, साडेचार हजार अमेरिकन्स व दीड लाखावर इराकी मरण पावले - त्यातले बहुतेक निरपराध नागरिक.

युद्ध नको म्हणून कारवाई सुरु होण्याआधी व नंतरही जगभर अनेक मोठ्या शहरात निदर्शने झाली. ती सामान्य माणसांनी उत्स्फूर्तपणे केली. यात एकूण साडेतीन कोटी लोक सामील झाले असावेत. लंडनमध्ये १५ लाख लोकांनी मोर्चा काढला. हा ब्रिटनच्या इतिहासातील सर्वात मोठा मोर्चा होता. अशा त्याच सुमाराच्या निदर्शनात इटलीत रोममध्ये ३० लाख लोक होते. (अमेरिकेत फक्त एक हजार लोक राजधानीत जमले!)

मुद्दा हा की जगभर जनमत इतके विरुद्ध असूनही अमेरिका व ब्रिटन या दोनही लोकशाही राष्ट्रांनी आपले युद्धखोरीचे धोरण अजिबात बदले नाही. अशा निषेधांची विफलता मात्र अधोरेखित झाली.

त्यातही अमेरिकेची विकृती समजण्यासारखी आहे, म्हणजे, विकृती जोपर्यंत समजणे शक्य आहे, तोपर्यंत! पहिल्या जॉर्ज बुशने पहिल्या इराक युद्धानंतर (१९९०-९१) सद्दाम हुसेनला उलथवण्याची संधी गमावली असा तेथे उजव्या बाजूचा व अनभिज्ञ जनतेचा ग्रह होता . त्यामुळे २०११च्या अमेरिकेवरील हल्ल्यानंतर प्रथम अफगाणिस्तान व नंतर इराक ही लक्ष्ये अमेरिकनांनी मान्य केली असे दिसते. अशी लोकमान्यता कितीही अनैतिक असली तरी सोईची असल्याने लोकशाही देश तिचा फायदा घेतात.

पण यातला ब्रिटनचा सहभाग कायमच संशयास्पद राहिलेला आहे. २००९ साली ब्रिटनमध्ये इराक युद्धाची संपूर्ण व निष्पक्षपाती चौकशी करण्यासाठी एक आयोग नेमण्यात आला. ६ जुलै २०१६ ला, म्हणजे सहा वर्षांचे युद्ध संपल्यानंतर सात वर्षांनी आयोगाचा (२६ लाख शब्दांचा!) प्रचंड अहवाल प्रसिद्ध झाला आणि या पापाला अधिकृत वाचा फुटली.

त्यानुसार युद्धासाठी सरकारने दिलेली खोटी कारणे अशी : सद्दाम हुसेनकडे प्रचंड नर-संहार करू शकणारी अस्त्रे आहेत व अगदी काही मिनिटांच्या अवधीत तो ही अस्त्रे वापरून पश्चिमेची मोठी हानी करू शकतो. सद्दाम हुसेन व अमेरिकेवर हल्ला करणारी अल-कईदा यांचे संगनमत आहे व ते पश्चिमेच्या विरोधात आहे. सद्दाम हुसेनची राजवट हा अशा रीतीने अमेरिका व ब्रिटन यांना नजीकचा धोका आहे. म्हणून युद्धाला पर्याय नाही.

वस्तुत: इराकमधील अस्त्रांचा छडा लावण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाच्या विद्यमाने निरीक्षकांची एक तुकडी इराकमध्ये कार्यरत होती. त्यांना सुरुवातीला नाही पण नंतर इराकचे सहकार्य मिळत होते. त्यांना जो काही काळ तेथे मिळाला, त्यात त्यांना अशी अस्त्रे सापडली नाहीत. पण त्यांचा पुढचा शोध अपुरा राहिला कारण युद्ध सुरू झाले. त्यावेळी त्यांनी अधिक वेळ मिळावा अशी मागणी केली होती. त्या विनंतीकडे दुर्लक्ष होईल अशी घाई या दोन राष्ट्रांनी केली. त्यातही भलावण अशी केली की अशी अस्त्रे लपवण्यात इराकी वाकबगार आहेत. युद्धही संयुक्त राष्ट्रसंघाच्या पुरेशा संमतीखेरीज सुरू झाले.

युद्ध सुरु झाल्यावर साधा प्रश्न जगाला पडला - जर ही विनाशक शस्त्रात्रे सद्दामकडे असती, तर ती त्याने अमेरिका-ब्रिटन विरुद्ध युद्धात बाहेर का काढली नाहीत? अशी अस्त्रे युद्धासाठीच तर असतात. या प्रश्नाला तेव्हाही न अमेरिकेकडे समाधानकारक उत्तर होते, न ब्रिटनकडे. अहवाल याची दाखल घेतो - अपुऱ्या माहितीवर आधारित युद्धाचा निर्णय घेण्यात आला.

युद्धाच्या वेळचा ब्रिटनचा पंतप्रधान टोनी ब्लेअर याने अमेरिकन अध्यक्ष जॉर्ज बुश याला पाठवलेल्या पत्रात 'काहीही होवो, मी तुमच्याबरोबर आहे' असे लोटांगण घातल्याचे आता उघड झाले आहे. सल्लागारांनी तेव्हाच त्याला सांगितले होते की इतका उघड पाठिंबा, तोही लेखी, देऊ नका, त्यामुळे ब्रिटन अनावश्यकरीत्या अमेरिकेला बांधील राहील. स्वत:च्या सल्लागारांचे ब्लेअरने ऐकले नाही. हे पत्र आता बाहेर आले असले तरी युद्धकालापासूनच ब्लेअर हा अमेरिकेचा पाळीव कुत्रा आहे (अक्षरश: या शब्दांत) हे मत ब्रिटनमध्ये रूढ झाले आहे.

सद्दाम-अल कईदा युती हाही मुद्दा पोकळ ठरतो. (किंबहुना सद्दाम व अल-कईदा यांच्यात वैरच होते). सद्दाम हुसेन हा ब्रिटनला धोका नव्हता हेही अहवालाने स्पष्ट केले आहे.

तिसरा महत्त्वाचा मुद्दा अहवालाने पुढे आणला. तो म्हणजे, सद्दामच्या पाडावानंतर नवा इराक कसा उभा करायचा याची कोणतीही निश्चित योजना नव्हती. हा प्रश्न किती गंभीर होणार याची जाणीवच नव्हती. युद्ध सुरु करण्याच्या आधी हे काम करणे आवश्यक होते.

अहवालात हे म्हटलेले नाही, पण त्या वेळी ब्रिटन आणि

अमेरिका अशा स्वप्नरंजनात होते की सद्दामच्या दडपणाखाली गांजलेली इराकी जनता आपल्या सैन्याचे मुक्ती-सैन्य म्हणून स्वागत करेल.

तसे घडले नाही. घडणारही नाही हे ओळखून अमेरिका गेली, ब्रिटन गेले, मागे राहिले ते स्थानिक इराकी. त्यांना या युद्धाचे परिणाम भोगायला लागत आहेत - प्रचंड हिंसाचार चालू आहे, सुन्नी-शिया वैर वाढत आहे, या अराजकात इस्लामिक स्टेटचा जन्म झाला आहे आणि त्याने देशाचा मोठा भूभाग बळकावलेला आहे.

अहवालानुसार ब्रिटनने अगदी नाक घासत अमेरिकेची हांजी हांजी केली पण इराकवरील आक्रमणापासून तेथील संपूर्ण वास्तव्यात अमेरिकेने ब्रिटनला कधीही ना विश्वासात घेतले, ना महत्त्वाची भूमिका दिली. सगळे निर्णय अमेरिकेने घेतले. उदा. ब्रिटीश सैन्याला बसरा या इराकमधील बगदादपासून दूर असणाऱ्या दुय्यम शहराचा ताबा देण्यात आला. ब्रिटीश सैन्याला तेथे आपण काय करणे अपेक्षित आहे हे जसे माहिती नव्हते, तसेच तेथील स्थानिक परिस्थितीविषयीही - स्थानिक नेते कोण, जमातींचे आपसातील संबध, इत्यादी - ब्रिटीश सैन्य पूर्णत: अंधारात होते. परिणामत: हे सैन्य स्थानिक माह्दी गटाने कोंडीत पकडले व निष्प्रभ केले. थोड्या पूर्व तयारीने ही वेळ येती ना. अहवाल नोंद घेतो की शेवटी वेळ अशी आली की ब्रिटीश सैन्याला याच हल्लेखोरांशी वाटाघाटी करणे भाग पडले - आमच्यावरचे हल्ले थांबवा, आम्ही आमच्या कडचे तुमचे कैदी सोडतो - हा ब्रिटीश सैन्यासाठी युद्धातला अत्यंत अपमानास्पद नीचांक होता. रातोरात बसरा सोडण्याचा ब्रिटीश निर्णयही अमेरिकेला आवडला नाही.

अहवाल, एकूण ब्रिटनच्या त्या वेळच्या निर्णय प्रक्रियेवर प्रखर प्रकाश झोत टाकतो. लष्कर - ज्यांची माणसे मृत्यूला साक्षात सामोरी जाणार होती, नोकरशाही - जिला 'सुरक्षित खेळा' हे बाळकडू असते, आणि जन-मत, जे लोकशाहीत सर्वश्रेष्ठ म्हटले जाते, या कोणालाही न जुमानता निर्वाचित सरकारने हे युद्ध एका परक्या देशावर लादले. त्याच्या इस्लामिक स्टेटच्या भस्मासुराच्या करतूती जगभर चालू आहेत.

अहवालाच्या प्रसिद्धीनंतर ब्लेअर महाशयांनी युद्धाचा निर्णय योग्यच होता हाच सूर लावून धरला. ज्या काही चुका झाल्या त्या किरकोळ! 'सद्दाम जाणे' हा एकच मुद्दा ब्लेअर (व बुश) अजूनही घोकत आहेत. पण तो जाण्याची किती किंमत कोण मोजतो याची त्यांना फिकीर नाही.

वस्तुत: अशा अहवालाची जरूरी अमेरिकेत आहे. तेथे ते होणार नाही. निदान ब्रिटनमध्ये १० वर्षे पंतप्रधान असणाऱ्या व्यक्तीवर परखड टीका करणारा हा अहवाल प्रसिद्ध होऊ शकला हे तेथील संस्थांचे यश आहे. शहा कमिशनपासून श्रीकृष्ण कमिशनपर्यंतच्या अनेक अहवालांचा आपला अनुभव पहावा.

एका ब्रिटिश 'हुतात्मा' सैनिकाच्या वडिलांनी म्हटले आहे - ''या अहवालाच्या आधारावर मी युद्धखोरी करणारा गुन्हेगार म्हणून टोनी ब्लेअरला कोर्टात खेचू इच्छितो. तरच मी माझ्या मुलाच्या व्यर्थ मरणाबद्दल माझ्या बायकोची काहीतरी समजूत घालू शकेन... यासाठी मी दहा वर्षे वाट पाहतो आहे.''

*Email - artnondeco@yahoo.co.uk*
*Website - www.art-non-deco.com*